

कणकवली : मार्गदर्शन करताना सत्यवान राणे, डी आर परब, रघुनाथ गोवेकर, सौ दळवी.

## जनशिक्षण संस्थानतर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा

**कणकवली (शहर वार्ताहर) :** दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.त्यामुळे तापमानात वाढ , पावसाचे प्रमाण कमी, दुष्काळ पडणे, प्रदूषण अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे.हे टाळण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परिसरात किमान ५ झाडे तरी लावावीत.प्रदूषण रोखण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळावा.आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा.यातून आपोआपच आपले जीवन समृद्ध होईल, असे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते कणकवली कॉलेज प्रा. सत्यवान राणे यांनी केले. मानव साधन विकास संस्था संचालित मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत जन शिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या वतीने ५ जून रोजी कणकवली शिवाजीनगर येथील गोवेकर सभागृहात जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. यावेळी श्री. राणे बोलत होते. याप्रसंगी जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गचे संचालक डी आर परब, पंचायत समिती सदस्य सौ. सुचिता दळवी, रघुनाथ गोवेकर, श्री धुरी व महिला उपस्थित होत्या. डी आर परब यांनी प्रास्ताविकपर भाषणात कार्बनडायऑक्सईडचे महत्त्व, कार्बनची देवाण घेवाण, वृक्ष तोडीचे घातक परिणाम, जगतिकी करणात झाडांचे मूल्यमापन, जैवविविधता यावर माहिती दिली. सौ दळवी यांनीही पर्यावरणाचे महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्या. आभार आर. एल. खरात यांनी मानले.

दै. पुढारी - दि. ०८/०६/१७



कणकव
ज्ये
जोशी यां
अभ्यासू
गेला आ
कोकण र
हानी झाल
निर्माण व
आहे, अ
राज्य नि
महेंद्र नाटे
वाहिली.
वृक्ष
कार्यालया
श्रध्दांजलं
प्रा. नाटेक
वाय.जी.
विश्वनाथ
के. एस.

## इन
## रस

सावंतवाडी
इन्सुल
वस्तीकडे
केल्याची
तहसीलदा
अतिक्रमण
केली आहे.
याबा
सावंतवाडी
संजू परब
पं.स.सभाप
नगरसेवक
आडिवरेकर
गावडे, प्र
भालचंद्र ग
गावडे, मह
तसेच महेश
ग्रामस्थ व